मसुदा
क्र. /२०१७–१८

गोपनीय
व्यवस्थापन परिषद

# मुंबई विद्यापीठ

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सभा ***सोमवार, दिनांक ५ फेब्रुवारी, २०१८ रोजी दुपारी ४.३० वाजता*** व्यवस्थापन परिषदेचे दालन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, कलिना कॅम्पस, विद्यानगरी, सांताक्रुझ, मुंबई –४०० ०९८ येथे आयोजित करण्यात आली होती. सभेमध्ये खालील नमूद केल्याप्रमाणे सदस्य उपस्थित होते:–

| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. देवानंद शिंदे (कुलगुरू) | – | अध्यक्ष |
| २. | डॉ. विष्णू मगरे (प्र–कुलगुरू) | – | सदस्य |
| ३. | श्री. दिपककुमार मुकादम | – | सदस्य |
| ४. | डॉ. मुरलीधर कु–हाडे | – | सदस्य |
| ५. | डॉ. (रश्मी ओझा) | – | सदस्य |
| ६. | प्रा.डॉ. गौतम गवळी | – | सदस्य |
| ७. | डॉ. दिनेश कांबळे (कुलसचिव) | – | सदस्य सचिव |
| ८. | श्री. विजय तायडे (वित्त व लेखा अधिकारी) | – | निमंत्रित |
| ९. | डॉ. अर्जुन घाटुळे (संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ) | – | निमंत्रित |

## ➢ स्वागत

कुलसचिवांनी स्वत:च्या तसेच विद्यापीठ प्रशासनाच्यावतीने उपस्थित सर्व सन्माननीय सदस्यांचे हार्दिक स्वागत केले.

## ➢ अभिनंदन

डॉ. सुनिल पाटील (विद्यार्थी विकास विभाग) यांनी विद्यार्थ्यांचे प्रतिनिधीत्व चांगल्याप्रकारे करुन विद्यापीठास अश्वमेध, अविष्कार, इंद्रधनुष्य इत्यादी अनेक पारितोषिके मुंबई विद्यापीठास मिळवून दिल्याबद्दल त्यांचे व त्यांच्या सर्व सहका–यांचे अभिनंदन करण्यात आले व सत्कार करण्यात आला.

डॉ. अंबुजा साळगावकर, संगणकशास्त्र विभाग यांचे वाधवानी इप्स्टिटयुट ऑफ आर्टिफिशियल इन्टेलीजन्स च्या कामी उत्तम सहकार्य लाभत असल्यामुळे त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

➢ **श्रध्दांजली**

**डॉ. अनिल नितनवरे**

विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाचे सभासद, युगवाणीचे संपादक व ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अनिल नितनवरे यांचे हृदय विकाराच्या झटक्याने दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ५३ वर्षांचे होते.

**श्री. रामचंद्र बनसोडे**

ज्येष्ठ तमाशा कलावंत व नाटयकार श्री. रामचंद्र बनसोडे यांचे दिर्घ आजाराने दिनांक ३१ जानेवारी, २०१८ रोजी निधन झाले.

**बाब क्र. १ वित्त व लेखा समितीच्या दिनांक ३० डिसेंबर, २०१७ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर.**

ठराव : वित्त व लेखा समितीच्या दिनांक ३० डिसेंबर, २०१७ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त मान्य करण्यात आले.

**बाब क्र.२ "आगा खान फाउंडेशन" या संस्थेला दिनांक १ मार्च, २०१८ रोजी त्यांचा हिरक महोत्सव कार्यक्रम साजरा करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन समोरील मोकळी जागा व क्रिकेट ग्राऊंड दिनांक १२ फेब्रुवारी, २०१८ ते ५ मार्च, २०१८ पर्यंत वापरण्यास परवानगी देणे व भाडे ठरविण्याबाबत.**

ठराव : सखोल चर्चेनंतर असा ठराव करण्यात आला की, "आगा खान फाउंडेशन" या संस्थेला दिनांक १ मार्च, २०१८ रोजी त्यांचा हिरक महोत्सव कार्यक्रम साजरा करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन समोरील मोकळी जागा व क्रिकेटचे मैदान कार्यक्रमाच्या पूर्व तयारीसाठी व कार्यक्रमोत्तर आवरा-आवरीच्या कामासाठी दिनांक १२ फेब्रुवारी, २०१८ ते ५ मार्च, २०१८ पर्यंत देण्यास मान्यता देण्यात आली.

असाही ठराव करण्यात आला की, हिज हायनेस प्रिन्स आगाखान यांचे शैक्षणिक क्षेत्रातील कार्यासह विविध क्षेत्रातील सामाजिक कार्य लक्षात घेता विद्यापीठातर्फे त्यांचा सत्कार करण्यात यावा. तसेच, त्यांचे शैक्षणिक क्षेत्रातील कार्य लक्षात घेता भविष्यात मुंबई विद्यापीठ व आगा खान एज्युकेशन सर्विसेस् (A.K.E.S.) यांच्यात शैक्षणिक स्तरावर संबध दृढ करण्यास विद्यापीठातर्फे सकारात्मक पावले उचलण्यात यावीत.

**बाब क्र.३ The eight Orders passed by the Industrial Court in the matters of temporary employees who had filed complaints/petitions in the respective courts regarding regularization and permanency.**

ठराव

कुलसचिवांनी असे स्पष्ट केले की, विद्यापीठातील अंदाजे १२०० कर्मचारी अनेक वर्षापासून विद्यापीठात तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत आहेत व त्यांनी औद्योगिक न्यायालयात विविध प्रकारच्या याचिका दाखल केल्या आहेत, अशा याचिकेवर झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने विद्यापीठाने स्पष्ट भूमिका घेणे आवश्यक आहे.

सदर कर्मचा-यांना समान काम समान वेतन तत्वानुसार प्रत्येक संवर्गातील कर्मचा-यांस वेतन द्यावे लागणार असून विद्यापीठास मोठा आर्थिक भार सोसावा लागणार असल्याचे सदस्यांनी निदर्शनास आणले. त्याच बरोबर अत्यंत कमी वेतनावर कित्येक वर्षापासून १२०० कर्मचारी तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत असून त्यांच्यावर अवलंबून असलेल्या १२०० कुटुंबाबद्दल सदस्यांनी संवेदना व्यक्त केल्या.

यास्तव सदर बाबीवर सविस्तर चर्चा करण्याठी व औद्योगिक न्यायालयाने दिलेल्या विविध निर्णयातील कायदेशीर बाबी समजून घेण्यासाठी ॲड. महेश शुक्ला, मानद् विधी सल्लागार, मुंबई विद्यापीठ यांना पाचारण करण्यात आले. ॲड. महेश शुक्ला यांनी या प्रकरणाशी संबंधित विविध कायदेशीर मुद्यांचे विश्लेषण केले. व्यवस्थापन परिषदेने याबाबत संवेदनशीलता दाखवली व विद्यापीठ स्तरावर स्पष्ट व धोरणात्मक निर्णय घेण्याकरिता खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.

१. श्री. दिपककुमार मुकादम (निमंत्रक),
२. श्री. रुपेश मालुसरे (अधिसभा सदस्य)
३. डॉ. एम.एस. कु-हाडे (व्यवस्थापन परिषद सदस्य)
४. श्री. महेश शुक्ला, (विधी सल्लागार),
५. डॉ. (श्रीमती), रश्मी ओझा (विभाग प्रमुख, विधी विभाग, सदस्य),

सदर समितीने दोन महिन्यात अहवाल सादर करावा.

सदर प्रकरणातील कायदेशीर गांभीर्य लक्षात घेता असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठाने याबाबत त्वरित उच्च न्यायालयात caveat (कॅव्हेट) दाखल करावे. कर्मचा-यांनी जर उच्च न्यायालयात याचिका दाखल केली तर विद्यापीठाने क्रॉस पिटीशन दाखल करावी. असाही ठराव करण्यात आला की सदर याचिकेत विद्यापीठाच्यावतीने ॲड. महेश शुक्ला ऑन रेकॉर्ड असतील व मा. उच्च न्यायालयात प्रखरपणे बाजू मांडण्यासाठी वरिष्ठ वकिलाची (सिनियर कौन्सिल) नेमणूक करण्यात यावी.

पुढे असाही ठराव करण्यात आला की, विद्यापीठातील काही विभाग प्रमुखांनी विद्यापीठाच्या परवानगी शिवाय शिक्षकेतर कर्मचा-यांची अस्थायी पदावर नेमणूक केली असल्यास याची गंभीर नोंद घेण्यात यावी व विभाग प्रमुखांना सक्त सुचना देण्यात याव्यात.

- विद्यापीठाने सूचना दिल्या असताना विद्यापीठाच्या सूचना न पाळता कोणत्या विभागाने शिक्षकेतर कर्मचा-यांची नेमणूक केली, याची सविस्तर माहिती सादर करण्यात यावी.

**बाब क्र.४** **मुंबई विद्यापीठात बाळासाहेब ठाकरे अध्यासनाबाबत स्थापन केलेल्या समितीचा अहवाल विचारार्थ.**

ठराव असा ठराव करण्यात आला की, मुंबई विद्यापीठात बाळासाहेब ठाकरे अध्यासनाबाबत रुपरेषा ठरविण्यासाठी स्थापन केलेल्या डॉ. एम.एस.कु-हाडे (निमंत्रक), डॉ. सुधा मोहन व डॉ.बाळकृष्ण भोसले यांच्या समितीने सादर केलेला अहवाल दुरुस्तीसह मंजूर करण्यात आला.

**बाब क्र.५** **दिनांक २४ ते २५ फेब्रुवारी, २०१८ रोजी किल्ले रायगड येथे मुंबई विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने "रायगड : परिक्रमा शिवराजधानीची" या उपक्रमाच्या आयोजनासाठी आणि सदर उपक्रमास होणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

ठराव असा ठराव करण्यात आला की, मुंबई विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने "रायगड : परिक्रमा शिवराजधानीची" या उपक्रमाच्या आयोजनासाठी होणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. सदर खर्च मुंबई विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठ यांनी विभागून (समप्रमाणात) करावा.

**बाब क्र.६** **आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांचे जन्म गाव पोंभुर्ले तालुका देवगड, जिल्हा सिंधुदूर्ग हे विद्यापीठाच्यावतीने विविध विकास कामासाठी दत्तक घेवून उपक्रम राबविण्यासाठी अपेक्षित निधीच्या तरतुदीसाठी सादर.**

ठराव असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठाच्यावतीने शैक्षणिक वर्षे २०१७-१८ मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेअंर्तगत आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांचे "जन्मगाव-पोंभुर्ले, तालुका-देवगड, जिल्हा-सिंधुदूर्ग" हे गाव दत्तक घेवून विविध विकास कामासाठी उपक्रम राबविण्यासाठी अंदाजे रु. २,४४,०००/- (रुपये दोन लाख चव्वेचाळीस हजार फक्त) च्या खर्चास मंजूरी देण्यात आली.

<u>चर्चेच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आले.</u>

१) हिंदी विभागातील एम. फिल. च्या विद्यार्थ्यांनी दिनांक २५ जानेवारी, २०१८ रोजी श्री. दिपककुमार मुकादम व डॉ. व्ही.एन. मगरे (प्र-कुलगुरु) यांची भेट घेवून निवेदन दिल्याचे प्र-कुलगुरुंनी सभागृहात सांगितले. सदर विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात मोठया प्रमाणात वाढ केल्याचे निदर्शनास आणले.

व्यवस्थापन परिषदेच्या सभागृहात असा ठराव करण्यात आला की, विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात विद्यापीठाने केलेल्या वाढीबद्दल पुर्नविचार करण्यासाठी ज्या प्राधिकरणांनी शुल्क वाढीचा निर्णय घेतला होता, त्या प्राधिकरणांकडे (अधिष्ठाता मंडळ, विद्यापरिषद व व्यवस्थापन परिषद) फेरविचार करण्यासाठी पाठविण्यात यावे. तसेच, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०१, अन्वये विविध प्रकारचे शुल्क ठरविण्यासाठी शिक्षण शुल्क समिती गठीत करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात यावी.

२) विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी विविध मागण्यासाठी परिक्षा भवनासमोर उपोषण सुरु केले होते. त्यांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी मुंबई विद्यापीठाचे प्र–कुलगुरु, डॉ. व्ही.एन. मगरे व व्यवस्थापन परिषद सदस्य श्री. दिपककुमार मुकादम यांनी दिनांक २५ जानेवारी, २०१८ रोजी आंदोलनकर्ते विद्यार्थी यांची प्रत्यक्ष भेट घेवून त्यांच्या मागण्यांबाबत सविस्तर चर्चा केली व त्यांच्या मागण्यांच्या पुर्ततेबाबत उचित कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्यानंतर विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी उपोषण मागे घेतले".

३) विद्यापीठातील इमारतींना ज्या महान व्यक्तींची नांवे दिली आहेत त्यांची माहिती तसेच, विभागाचा इतिहास, स्थापना व्हिजन व मिशन इत्यादी बाबत सारांश पध्दतीने माहिती सर्व विभाग प्रमुखांनी त्यांच्या विभागाच्या दर्शनी भागात लावावी. यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात यावी.

१. डॉ. गौतम गवळी (निमंत्रक),
२. डॉ.शेफाली पंडया (विद्यापरिषद सदस्य),
३. श्री. रमेश कांबळे, समाजशास्त्र विभाग

४) वाधवानी इन्स्टिटयुट ऑफ आर्टिफिशियल इन्टेलीजन्स संस्था व महाराष्ट्र शासनाच्यावतीने मुंबई विद्यापीठ यांच्यात संयुक्त करार होणार असल्याने सदर संस्थेस मुंबई विद्यापीठातील आयटी पार्क मधील तिसरा मजला येथे काही अटी व शर्तीच्या अधीन राहून जागा उपलब्ध करुन देण्यात यावी.

सभेमध्ये सहभाग घेतल्याबद्दल सर्व उपस्थित सन्माननीय सदस्यांचे आभार व्यक्त करून अध्यक्षांच्या परवानगीने सभा समाप्त झाल्याचे कुलसचिवांनी घोषित केले.

S.Sawant 20/03/18
सहायक कुलसचिव

कुलसचिव

प्र–कुलगुरू 22/3/18

कुलगुरू 21-3-18